महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ११२ वा दिनांक : २६/०१/२०२५ वार : रविवार

## भाजप सरकारच्या काळात मतदारही सुरक्षित नाही : नाना पटोले



**मुंबई :** भाजप सरकारच्या काळात मतदारांचे मतदानही सुरक्षित राहिलेले नाही. निवडणूक आयोगाने मतदार याद्यात मोठा घोटाळा केला आहे. निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेसाठी जाहिर केलेली मतदार संख्या ९.७० कोटी आहे तर मोदी सरकारच्या आरोग्य विभागाने महाराष्ट्रातील प्रौढ मतदारांची संख्या ९.५४ कोटी असल्याचे जाहिर केले आहे, निवडणूक आयोगाने ही वाढीव संख्या कोठून आणली? मतदानादिवशी संध्याकाळी जाहिर केलेली ५८ टक्के मतदान दुसऱ्या दिवशी ६६.५ टक्के कसे वाढले? लाडकी बहिण योजनेचा लाभ बांगलादेशींनी घेतल्याचे सरकार सांगत आहे, तसे विधानसभेला वाढलेले हे मतदार केंद्रातील भाजप सरकारने बांगलादेशातून आणले का? असा प्रश्न महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी विचारला आहे.

लोकशाहीचे रक्षण व मतदारांची जागृती करण्यासाठी काँग्रेस पक्षाने राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून राज्यभर आंदोलन करून पत्रकार परिषदा घेतल्या. नागपूर येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, मतमोजणी वेळी एक-दोन मतदार वाढले तरी निवडणूक रद्द होते, पण विधानसभेला ६० लाख मतदार वाढले पण त्यावर निवडणूक आयोग काहीच उत्तर देत नाही. रात्रीच्या अंधारात ७६ लाख मते कशी वाढली, याचे उत्तर निवडणूक आयोगाने अजून दिलेले नाही. पण हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक आयोगाची वकिली करत त्यावर स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. देवेंद्र फडणवीसांना ती स्क्रिप्ट नरेंद्र मोदी, अमित शाह, की निवडणूक आयोगाने दिली होती, असा सवाल नाना पटोले यांनी केला.

लोकसभा निवडणूक २०१९ ते २०२४ या पाच वर्षात राज्यात ५० लाख मते वाढली, तर लोकसभा निवडणूक २०२४ व विधानसभा निवडणूक २०२४ या सहा महिन्यात ४६ लाख मते वाढली, एवढ्या मोठ्या प्रमाणावर मतदार वाढले कसे, याचे उत्तर निवडणूक आयोग देत नाही, आता तर निवडणूक आयोगाने त्यांच्या वेबसाइटवरून सर्व डेटाच डिलीट केला आहे. भाजप निवडणूक आयोगाच्या मदतीने दिवसाढवळ्या लोकशाहीचा गळा घोटत आहे. काँग्रेस पक्ष लोकशाहीच्या रक्षण व निवडणूक आयोगाच्या घोटाळ्याविरोधात रस्त्यावर व न्यायालयीन लढा देत आहे, असे नाना पटोले म्हणाले.

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधत लोकशाहीचे रक्षण व मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी काँग्रेस पक्षाने राज्यभर आदोलन केल तसेच पत्रकार परिषदाही घेतल्या. नागपूरमध्ये प्रांताध्यक्ष नाना पटोले यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजप सरकार व निवडणूक आयोगावर तोफ डागली. मुंबईत प्रोफेशनल काँग्रेसचे प्रविण चक्रवती व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पत्रकार परिषद घेतली. यवतमाळमध्ये माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करून जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. कोल्हापुरात खासदार विशाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करून निवेदन देण्यात आले. अहिल्यानगर मध्ये प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी यांच्या नेतृत्वाखाली पत्रकार परिषद घेण्यात आली. पुणे, सोलापूर, नाशिक, नांदेड, बीड, जालना, लातूर, वाशीम, पैठण, ब्रम्हपुरी सह जिल्हा व तालुका स्तरावर आंदोलन करण्यात आले.

## मनसे पदाधिकाऱ्याची अजित पवारांच्या नेत्याकडून हत्या?: जितेंद्र आव्हाडांचा आरोप



**मुंबई :** ठाण्यातील मनसे पदाधिकारी जमील शेख यांची सुमारे ४ वर्षांपूर्वी गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी जमील शेख यांच्या हत्येला वाचा फोडत अनेक दावे केले. जमील शेख यांच्या हत्येचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे तत्कालीन नगरसेवक नजीब मुल्ला यांच्यावर लावण्यात आला होता. या गुन्हेगाराला वाचवणारा आका सरकारमधील मंत्रिमंडळात असल्याचा गौप्यस्फोट आव्हाड यांनी केला आहे. तसेच मंत्रिमंडळात बसलेले सर्व मंत्री या हत्येला जबाबदार आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

मनसे पदाधिकारी जमील शेख यांची नोव्हेंबर २०२० मध्ये हत्या झाली होती. ते राबवडीतील बिस्मिल्ला हॉटेल समोरून मोटरसायकलवरून जात असताना दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी त्यांच्यावर गोळीबार केला आणि त्यानंतर ते फरार झाले. या हल्ल्यात जमील शेख यांच्या त्यांच्या डोक्यात गोळी लागली. त्यांना जखमी अवस्थेत एका खासगी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी मुख्य आरोपी ओसामा शेख याला ठाणे पोलिसांनी उत्तर प्रदेश पोलिसांच्या मदतीने अटक केली होती. मात्र, चार वर्षांनी जितेंद्र आव्हाड यांनी हे प्रकरण उकरून काढले आहे.

मंत्रिमंडळात बसलेले सर्व मंत्री या हत्येला जबाबदार आहेत. एक नाही अनेक आकांचे आका मंत्रिमंडळात बसले आहेत, असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला. त्या आरोपीला पकडायला जाणाऱ्या पोलिसाचीच बदली केली होती आणि त्या गुन्हेगाराची एवढी हिंमत की त्या बदलीचे स्टेटस व्हॉट्सअॅपवर ठेवले होते, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.

जितेंद्र आव्हाड यांना जमील शेख हत्या प्रकरणातील गुन्हेगाराचे नाव विचारले असता, या गुन्हेगाराचे नाव कुटुंबाने घेतले आहे. एफआयआरमध्येही ते नाव आहे. पोलिसांनी कितीही लपवले तरीही एफआयआर रद्द करता येत नाही. एफआयआरमध्ये नाव असताना त्याचे चार्जशीटमध्ये नाव नाही. चार्जशीटमध्ये त्याचा दोषी किंवा निर्दोष असा पोलिसांनी उल्लेखही केलेला नाही, याचा अर्थ काय घ्यायचा? असा सवाल करत त्याने २०१४ मध्येही असाच गुन्हा केला होता. तरीही पोलिसांनी काही कारवाई केली नाही. त्याचे नाव नजीब मुल्ला आहे, असे आव्हाड यांनी सांगितले.

नजीब मुल्ला पूर्वी आमच्याबरोबर होता. त्याचे नाव एफआयआरमध्ये आहे. ओसामा नावाचा जो गुन्हेगार आहे, ज्याने ही सुपारी घेतली. त्याने तीन पेनड्राईव्ह पोलिसांना दिले होते. पण पोलिसांकडे तीनचे चार पेनड्राईव्ह झाले. म्हणजे पेनड्राईव्हसुद्धा मॅनेज करून पाठवला, असा गौप्यस्फोट जितेंद्र आव्हाड यांनी केला.

या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या इन्स्पेक्टरचे नाव नितीन ठाकरे. पोलिस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी संपूर्ण प्रकरणाची चौकशी लखनौ, गोरखपूरपर्यंत केली होती. पहिला आरोपी पकडला त्याने कुणाच्या सांगण्यावरून गोळी झाडली, त्याचे नाव सांगितले. मात्र त्याच नितीन ठाकरेंची बदली ८ तासांत केली. हिंमत असेल तर त्यांच्या हातात तपास द्या, असे आव्हान जितेंद्र आव्हाड यांनी केले. नितीन ठाकरेंची बदली झाल्यावर नजीब मुल्लाने स्टेटस ठेवली होते. एवढी हिंमत कुठून होते, ही मानसिकता, विकृती आहे. जमील शेखला त्यानेच २०१४ ला मारले होते, असा आरोप जितेंद्र आव्हाडांनी केला.

सगळ्या निवडणुका जिंकल्यानंतर मी हा विषय काढतो. त्या कुटुंबाने अनेकदा माझी भेट घेण्याचा प्रयत्न केला परंतु मी भेट नाकारली. कारण आपण राजकारण करतोय असा आरोप व्हायला नको. मी राजकारण करत नाही. मी त्या कुटुंबाच्या बाजूने बोलतोय. मला राजकारण करायचं असते तर निवडणुकीत वापर केला असता. एफआयआर मध्ये नाव असेल तर पोलिसांना चार्जशीटमध्ये तो आरोपी आहे की नाही? हे सांगावेच लागते, असे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले.

## वाल्मीक कराडच्या साथीदाराचे नवे CCTV फुटेज समोर

**बीड :** संतोष देशमुख यांच्या हत्येचा तपास सुरू आहे. या प्रकरणाशी संबंधित आरोपींचे अनेक सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. त्यातच आता आणखी एक फुटेज समोर आले असून वाल्मीक कराडचा साथीदार बालाजी तांदळे हा त्या फुटेजमध्ये दिसत आहे. बालाजी तांदळे यांनी पोलिस कोठडीत असलेल्या आरोपींसाठी ब्लँकेट खरेदी केले असून ते आरोपींना देण्यात आल्याचा आरोप संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केला आहे. सध्या हे सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे.

बालाजी तांदळे हा कारेगावचे सरपंच असून वाल्मीक कराडचा साथीदार देखील आहेत. वाल्मीक कराडला अटक झाल्यानंतर तो त्याला भेटण्यासाठी बीड पोलिस ठाण्यात देखील गेला होता. यावेळी बालाजी तांदळे याने बीड शहर पोलिस ठाण्यात मला धमकावल्याचा आरोप धनंजय देशमुख यांनी काही दिवसांपूर्वी केला होता. तसेच त्याने आरोपी विष्णू चाटे याला पाण्याच्या बॉटल्स न्यायालयात दिले असल्याचे देखील समोर आले होते. अशातच आता याच बालाजी तांदळेचा नवीन सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे.

या सीसीटीव्ही फुटेज मध्ये बालाजी तांदळे आरोपींसाठी ब्लँकेट खरेदी करताना दुकानामध्ये दिसतो आहे. आरोपी विष्णू चाटे, सुदर्शन घुले, जयराम चाटे आणि महेश केदार यांना गेवराईच्या पोलिस कोठडीत ठेवले होते. त्यादरम्यान आरोपींना लागणारे साहित्य बालाजी तांदळेने एका दुकानातून खरेदी केले. याचाच हा सीसीटीव्ही समोर आला आहे. या फुटेजमध्ये दुकानातून ब्लँकेट घेतल्याचे दिसत आहे. हेच ब्लँकेट पोलिस कोठडीत असलेल्या संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना देण्यात आल्याचा आरोप धनंजय देशमुख यांनी केला आहे.

काही दिवसांपूर्वीच वाल्मिक कराडने खंडणी मागितली त्या दिवशीचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले होते. अशातच आता पुन्हा एकदा वाल्मीक कराडचा साथीदार बालाजी तांदळेचा सीसीटीव्ही फुटेज समोर आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. पोलिस कोठडीतील आरोपींसाठी साहित्य खरेदी करून त्यांना दिल्याचा आरोप धनंजय देशमुख यांनी केला आहे. त्यामुळे आता पोलिस त्याला चौकशीसाठी ताब्यात घेणार का? जर तो या प्रकरणी दोषी असेल तर त्याच्यावर कारवाई करणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. पोलिस कोठडीतील आरोपींना ब्लँकेट पुरवल्याचे सिद्ध झाल्यास बालाजी तांदळेच्या अडचणी वाढू शकतात.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ जानेवारी २०२५


## २०२५ चा क्रांतिवीर भगवानराव पाटील सामाजिक पुरस्कार कॉम्रेड किशोर ढमाले यांना तर क्रांतिविरागना हौसाताई पाटील पुरस्कार ॲड. शैलजाताई मोळक यांना देण्यात येणार



**छत्रपती संभाजीनगर :** २०२५ चा क्रांतिवीर भगवानराव पाटील सामाजिक पुरस्कार कॉम्रेड किशोर ढमाले यांना देण्यात येणार.तसेच क्रांतिविरागना हौसाताई पाटील पुरस्कार ॲड. शैलजाताई मोळक यांना देण्यात येणार आहे. कॉम्रेड किशोर ढमाले हे धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील डोंगर दर्यात राहणाऱ्या आदिवासींच्या विकासासाठी, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सतत संघर्ष करत आहेत.

सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे मार्फत डोंगर दर्यात पाड्यात, वस्त्यांमध्ये राहणाऱ्या अडाणी अशिक्षित लोकांना संघटीत करुन, त्यांना त्यांच्या न्याय्य हक्कांची जाणीव करून देणे, त्यांच्यातील अंधश्रद्धा दूर करणे, प्रस्तापित सरकार विरोधात त्यांना लढाईला तयार करणे , हे काम ते सतत गेली ४० वर्षांहून अधिक काळ करत आहेत.

त्यासाठी त्यांनी अनेक वेळा तुरुंगवास भोगला आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे कामामध्ये त्यानी स्वतःला झोकून दिले आहे. प्रागतिक विचारांच्या लोकांना, पक्षांना एकत्र करणेसाठी धडपडत आहेत.

त्यांच्या या कामाची दखल घेऊन क्रांतिवीर भगवानराव पाटील जन्म शताब्दी समिती हणमंतवडिये आणि कडेगांव/खानापूर साहीत्य मंडळ यांनी क्रांतिवीर भगवानराव पाटील सामाजिक पुरस्कार २०२५ हा त्यांना देणेचा निर्णय घेतला आहे. या पुरस्काराचे हे २० वेळ वर्ष आहे. या अगोदर हा पुरस्कार प्राचार्य सायनाकर, ॲड दत्ताजीराव माने, क्रांतिवीर रामचंद्र लाड, प्रा. डॉ. बाबुराव गुरव, प्रा. डॉ. जयसिंगराव पवार, या वैभव नायकवडी, या. उल्का महाजन, का◌ॅम्रेड दत्ता देसाई, डॉ.शैलजा दाभोलकर, प्रा. डॉ अजिज नदाफ, प्रा. प्रतिमा परदेशी, भाई विवेक पाटील, प्रा. डॉ श्रीमंत कोकाटे, भाई धनंजय पाटील, कॉम्रेड धनाजी गुरव इत्यादींना हा पुरस्कार दिला आहे.

क्रातिविरागना हौसाताई पाटील सामाजिक पुरस्कार चे हे तिसरे वर्ष आहे. ॲड शैलजाताई मोळक या पुरोगामी विचारवंत आहेत. जिजाऊ ब्रिगेडच्या लढाऊ कार्यकर्त्या आहेत. स्वतः चांगल्या सामाजिक कार्यकर्त्या आहेत, उत्तम लेखिका आहेत. सजग प्रकाशिका आहेत. अ प्रकाशित कर्तुत्ववान महिलांना प्रकाशात आणनेच मोठं काम त्या सतत करत आहेत.

वाचन चळवळ चालवणेसाठी सार्वजनिक वाचनालय चालवत आहेत. जिजाऊ, शिवराय, संभाजी महाराज यांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार त्या सातत्याने करीत आहेत. त्यांच्या या कामाची दखल घेऊन त्यांना क्रांतिविरागना हौसाताई पाटील सामाजिक पुरस्कार २०२५ देणेचा निर्णय घेतला आहे. या अगोदर हा पुरस्कार का◌ॅम्रेड स्मिताताई पानसरे, प्रा. डॉ लीनाताई निकम यांना देण्यात आला आहे.

हणमंतवडिये येथे श्री आनंदराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रा. विलासराव पाटील, प्रा विश्वनाथ गायकवाड, कवी रघुराज मेटकरी, एम बी जमादार, सु. धो. मोहीते, आत्माराम मोरे, ॲड सुभाष पाटील यांच्या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले.

हे दोन्ही पुरस्कार दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी हणमंतवडिये येथे आमदार बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत.

## जेईएस महाविद्यालयाच्या विद्यार्थीसंसदेच्या अध्यक्षपदी तन्मय अग्निहोत्री यांची निवड



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जेईएस महाविद्यालय जालनाच्या शैक्षणिक वर्ष २४-२५ च्या विद्यार्थी संसदेच्या अध्यक्षपदी तन्मय अग्निहोत्री यांची निवड झाली असून, त्याबद्दल त्यांचे जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्री. श्रीनिवास भक्कड व व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्य आणि प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते , उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना आदी, तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.






# PCOD चा वाढता विळखा आणि होमिओपॅथी उपचार!

**बदनापूर :** PCOD म्हणजे काय? पीसीओडी म्हणजेच पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसीज हि महिलांमध्ये उद्भवणारी मासिक पाळीशी संबधित स्तिथी आहेसामान्य भाषेत समजून घ्यायच तर ही आजकाल स्त्रियांमध्ये उद्भवणारी एक सामान्य समस्या आहे, जी मुख्यतः हार्मोनल असंतुलनामुळे होते.

पीसीओडी ही एक स्थिती आहे ज्यामध्ये अंडाशयात बरीच अपरिपक्व अंडी निर्माण होतात, ज्याचे नंतर सिस्ट तयार होतात. ज्यामुळे वेळेवर स्त्रीबीज फुटत नाही आणि पीरिअड्स इर्रेग्युलर होतात ज्यामुळे गर्भधारणेत अडचण निर्माण होते.

PCOD च्या मागची कारणे अनेकदा हे असू शकतात:वजन वाढणेताणहार्मोनल असंतुलनजीवनशैलीतील बदल PCOD कोणाला आणि कधी होतो?पीसीओडी ची समस्या हि पूर्वी ३० ते ३५ वयोगटातील महिलांमध्ये दिसून येत होती. पण आता हि समस्या झपाट्याने वाढत आहे आणि १८ ते २० वयोगटातील मुलींमध्ये सुद्धा PCOD च्या समस्येचे लक्षणं दिसून येतात. याच कारण मुख्यतः जीवनशैलीतले बदल आणि वाढत्या हार्मोनल समस्या आहे.पीसीओडीची लक्षणं काय आहेत?

मासिक पाळीच्या समस्यावंध्यत्वशरीरावर अतिरिक्त केसवजन वाढणेओटीपोटात वेदनावाढलेलं ब्लड प्रेशरझोप न येणंथकवा जाणवणेडोकेदुखीअचानक मूड बदलणेपीसीओडी ची कारणे:PCOD ची समस्या जरी सामान्य असली तरी प्रत्येक स्त्रीमध्ये त्याची कारणे वेगवेगळी असू शकतात, जसे की:इन्सुलिनचे वाढते प्रमाणजीन्स (Genes): पीसीओडी आनुवंशिक आहे, अनेक वेळा महिलांना अनुवांशिकरीत्या पीसीओडी ची समस्या असू शकते.

इतर कारण जसे:अस्वस्थ जीवनशैलीनिष्क्रिय जीवनशैलीअयोग्य आहारपीरिअड्स मध्ये असंतुलन असणेशरीरात इन्सुलिनची जास्त मात्राPCOS काय आहे?बऱ्याच स्त्रियांना पीसीओस आणि पीसीओडी मधील अंतर कळत नाही. (PCOD)म्हणजे पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसीज आणि ( PCOS) म्हणजेच पॉलीसिस्टिक ओव्हेरियन सिंड्रोम.सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे पीसीओएस एक आजार आहे तर पीसीओडी हे त्याच एक लक्षण आहे.PCOS हा मेटाबॉलिक विकार आहे जो PCOD पेक्षा अधिक गंभीर आहे. या परिस्थितीत, अंडाशय जास्त प्रमाणात एंड्रोजन रिलीज करते आणि अंडाशयात अनेक सिस्ट तयार होतात.

ज्यामुळे स्त्रीबीज निर्मिती थांबते.PCOS च्या मागची कारणे अनेकदा हे असू शकतात:इन्सुलिन प्रतिकारहार्मोनल असंतुलनआनुवंशिक करणएंड्रोजन च्या लेव्हल्स वाढPCOS मुळे इतर आरोग्य समस्यांचा धोका वाढतो, जसे की:- टाइप २ मधुमेह- हृदय रोग- एंडोमेट्रियल कॅनसरनिदानPCOS चे निदान खालील बाबींवर आधारित असते:- क्लिनिकल लक्षणे- रक्त चाचण्या (हार्मोन्सची पातळी तपासण्यासाठी)- अंडाशयांचा अल्ट्रासाऊंड उपचार योग्य उपचार आणि जीवनशैलीत सकारात्मक बदल करून पीसीओडी आणि पीसीओएस च्या समस्या नियंत्रणात आणल्या जाऊ शकतात.

काही गोष्टी लक्षात ठेवून तुम्ही PCOD ला दूर ठेऊ शकता, यात प्रामुख्याने समाविष्ट आहे: पौष्टिक आहार ठेवा.१.साखर आणि कार्बोहायड्रेट टाळावे.२.जास्त फायबरयुक्त जेवण घ्या.३.पातळ प्रथिनेयुक्त पदार्थांचे सेवन करा.४.दररोज व्यायाम करा आणि शारीरिकदृष्ट्या सक्रिय व्हा.५.ताजी फळे आणि भाज्यांचे भरपूर सेवन करा.६.प्रक्रिया केलेले अन्न आणि संतृप्त चरबी टाळा.७.इस्ट्रोजेनची पातळी वाढवणारे जेवण टाळा.८.किमान ८ तास झोप घ्या.९.तुमचे ताण व्यवस्थापन सुधारा. १०.तेलकट किंवा तळलेले अन्न खाणे बंद करा.

PCOS एक व्यवस्थापनीय स्थिती आहे, योग्य जीवनशैलीतील बदल आणि वैद्यकीय उपचारांच्या संयोजनाने. वैद्यकीय तज्ञांशी नियमित सल्लामसलत करणे आवश्यक आहे.पॉलिसिस्टिक ओवरी सिंड्रोम (PCOS) साठी होमिओपॅथिक उपचार : होमिओपॅथिक उपचार पॉलिसिस्टिक ओवरी सिंड्रोम (PCOS) च्या लक्षणांवर लक्ष केंद्रित करतो आणि हार्मोनल संतुलन पुनर्स्थापित करण्याचा प्रयत्न करतो. खालील प्रमाणे काही होमिओपॅथिक औषधींची नावे आहेत जी एखाद्या तज्ञ होमिओपॅथीक डॉक्टरांच्या देखरेखीखाली लक्षणं जुळवून देण्यात आल्यास उपयुक्त ठरू शकतात.

१.सेपिया२.नॅट्रम म्युर ३.पल्सटिला ४.लैकेसिस ५.सिमिसिफुगा ६.ग्राफाइट्स संकलन



**डॉ. तनया राजेश राठोड**
(गुरूमिश्री हो.मे.कॉलेज, शेलगाव)

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ जानेवारी २०२५


## आमचा अभिमान, आमचे देशभक्ती : वंशपरंपरेची शौर्यगाथा

माझ्या कुटुंबाची कथा भारताच्या महान परंपरेशी जोडलेली आहे. खय्यामखानी (राजपूत) रक्ताचे वंशज असलेले, मी मोहम्मद सरवर खान यांचा पुत्र आणि उस्मान खान यांचा नातू आहे. आमच्या कुटुंबाचा इतिहास समर्पण, बलिदान आणि मातृभूमीच्या प्रेमाने भरलेला आहे.देशभक्तीचा व्यक्तिगत प्रवासदेशभक्ती माझ्यासाठी केवळ शब्द नसून, ती एक जीवनशैली आहे.

१९८५ पासून, मी प्रत्येक स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन सणासारखा साजरा करत आलो आहे. ही परंपरा माझ्या मुलांनी आणि आता नातवंडांनी पूर्ण मनाने स्वीकारली आहे. जेव्हा तिरंगा झळकतो आणि राष्ट्रगीताचा आवाज घुमतो, तेव्हा मनात असलेल्या अभिमानाची भावना शब्दांत व्यक्त करणे कठीण असते.

संघर्षाचे दिवस१९८० आणि १९९० च्या दशकात, सामाजिक तणाव, बॉम्बस्फोट आणि अनेक आव्हाने यांनी आपल्या एकतेची कसोटी पाहिली. पण मी नेहमीच मानतो की आपण सर्व भाऊ-बहिणी आहोत आणि जात-पंथ यांच्या पलिकडे जाऊन आपले बंधुभाव टिकवले पाहिजेत.

आज मला अभिमान वाटतो की आमचा परिसर, जो एकेकाळी संघर्षाने भरलेला होता, आता हे राष्ट्रीय सण मोठ्या उत्साहाने साजरे करतो.प्रदीप जायसवाल यांचे योगदानया प्रवासात, मी आमचे प्रदीप जायसवाल, आमचे आमदार, यांचा उल्लेख केल्याशिवाय राहू शकत नाही. ते केवळ आमदार नसून माझ्यासाठी बंधूच आहेत.

संकटाचा काळ असो किंवा सणांचा उत्सव, प्रदीप भैया यांनी नेहमीच सर्व धर्म आणि जातीच्या लोकांना साथ दिली आहे. त्यांच्या निस्वार्थ सेवेमुळे समाजात एकतेचा एक मजबूत धागा तयार झाला आहे.

भविष्यासाठी प्रेरणाआमच्या कुटुंबाचे मूळ झुंझुनू, राजस्थान येथे आहे, पण महाराष्ट्रातील आमची परंपरा देखील आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. दशकांपासून आम्ही एकतेचा संदेश देत आलो आहोत आणि ही परंपरा पुढच्या पिढ्यांनाही देत राहू.

आमच्या पूर्वजांनी शिकवले की, आपला अभिमान आपला देश हिंदुस्तान आहे.आपला देश, आपली ओळखभारत हा केवळ एक देश नाही तर तो एक भावना आहे, जो आपल्याला जोडतो. एक नागरिक म्हणून, आपले कर्तव्य आहे की आपल्या देशासाठी आपले सर्वस्व अर्पण करण्याची तयारी ठेवावी.

माझे कुटुंब कधीही कोणत्याही आव्हानापासून पळाले नाही आणि कधीही पळणार नाही. जय हिंद!




**लेखक**
**मोहम्मद मुजीब खान**
**अध्यक्ष,**
**मौलाना आझाद मुस्लिम एज्युकेशन डेव्हलपमेंट कौन्सिलनवी दिल्ली**
**मो. क्र. +९१ ९४२२७ ११७८६**


## कळंकी जि.प.उच्च प्राथमिक शाळेत हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न




**कन्नड (अरुण थोरात):** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कळंकी ता. कन्नड येथे हळदी कुंकू कार्यक्रम दि. २५ जानेवारी रोजी मोठ्या उत्सहात संपन्न झाला.

शाळा व पालक यांच्यात समन्वय साधून पाल्य व शाळा यांच्यात शैक्षणिक वातावरण निर्मिती, शालेय शिक्षणात पालकांचा सक्रिय सहभाग, विद्यार्थ्यांची शैक्षणिक, मानसिक प्रगती, आदीं वातावरण निर्मिती साठी दरवर्षी या उपक्रमाचे आयोजन केल्या जाते.

उपस्थिती पालक महिला व शिक्षिकांनी पारंपरिक पद्धतीने एकमेकींना हळद कुंकवाचे सौभाग्य वाण देऊण शुभेच्छा दिल्या. शिक्षीका श्रीमती बि.एस. बागुल, श्रीमती ए.व्ही. थोरात, भारताबाई थोरात, चांगुणाबाई थोरात, ठगनबाई पडवळ, नंदाबाई थोरात, विठाबाई थोरात अंगणवाडी सेविका वंदना थोरात आदी उपस्थित होत्या.याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती ची बैठक घेऊण विविध विषयांवर चर्चा केली.

आगामी काळात शाळेसाठी लागणाऱ्या भौतिक सुविधा, स्वच्छतागृह, मध्यान्ह भोजन व्यवस्था, संगणकीय सुविधा, प्रांगण विकास, ग्रामपंचायती कडून मिळणारा राखीव शैक्षणिक निधी मागणी आदीं बाबत चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रमोद थोरात, सदस्य रमेश थोरात, श्री पथवे, अरुण थोरात, शितल थोरात, सचिव तथा मुख्याध्यापक राहुल राठोड, जे.एस. सोनवणे, डी.जी. गुडलावार, व्ही.बी.ठाकरे आदीं सह पालक, शिक्षक उपस्थित होते.

## डॉ. बाळासाहेब लिहिणार यांना समाज सेवक पुरस्काराने सन्मानित



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष व राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे गेली बावीस वर्षांपासून मराठी भाषा विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेले डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी नोकरी करत करत सामाजिक भान ठेवून सामाजिक कार्यात स्वतः ला झोकून देऊन फुले शाहू आंबेडकरी विचाराचे कार्य चालू ठेवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या माध्यमातून त्यांच्या सहकार्यासह छत्रपती संभाजी नगर मध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली पहिले व साहित्यकार मा.लक्ष्मण माने यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे फुले शाहू आंबेडकरी साहित्य संमेलन असे दोन साहित्य संमेलन घेतली.

दोन हजार सोळा मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त परिषदेच्या सहकार्यासह मराठवाड्यातील निवडक १२५ गावात जाऊन परिषदेच्या मदतीने स्वखर्चाने १२५ गावात व्याख्याने दिली.

त्या प्रत्येक गावात बुद्ध आणि त्यांचा धम्म व भारतीय संविधान व अन्य पुस्तके भेट दिली. जानेवारी २०२५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद, पटाया इंडियन असोसिएशन थायलंड व सोनवणे फाउंडेशन नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ऋषिकेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली थायलंड देशाची राजधानी बँकॉक येथे पहिले विश्व साहित्य संमेलन घेऊन फुले शाहू आंबेडकर विचार परदेशात जाऊन मांडला.

त्यामध्ये डॉ. बाळासाहेब लिहिणार यांची मुख्य भूमिका होती. त्यांच्या अशा विविध स्वरूपाच्या कार्यास्तव कै. पुंजाबाबा प्रतिष्ठान व लोककला विकासमंच छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने डॉ. ऋषिकेश कांबळे, प्रा. सुनील वाकेकर माजी सभापती एकनाथराव त्रिभुवन यांच्या हस्ते राष्ट्रवादीभवन छत्रपती संभाजीनगर येथे डॉ. बाळासाहेब लिहिणार यांना त्यांची सौभाग्यवती आयु. उज्वला लिहिणार यांच्यासह सेवागौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

त्यानिमित्त प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे,डॉ.अरुण कोळी, डॉ. कालिदास फड,डॉ. ललित गोल्डे, डॉ. बाळासाहेब गायकवाड, रमेश सोनवणे, शारदाताई सोनवणे आदिनी अभिनंदन केले.

## नोकरीत जितकी सुरक्षितता नसते तितकी व्यवसायात असते : मंदार भारदे




**कन्नड (अरुण थोरात):** जसे लोक ट्रक, जीप, इतर वाहने भाड्याने देतात तसे आम्ही विमान भाड्याने देतो. नोकरी व छोटे मोठे व्यवसाय करून जीवनात मोठं काही तरी करायचं या जिद्द व ध्येयाने मी व्यवसायकडे वळालो.

व्यवसाय करणाऱ्याला जितकी सुरक्षा नसते तितकी व्यवसायात असते असे प्रतिपादन मंदार भारदे यांनी केले. पुढे ते म्हणाले मध्यवर्गाची चौकट मोडायची होती. झालो तर श्रीमंत नाही तर गरीब होईल. सर्वांनाच नोकरी मिळतात असे नाही मात्र व्यवसायात पन्नास टक्के यशस्वी होतात. व्यवसायाची कुठलिही पार्श्वभूमी नव्हती. जिकडे नजर फिरवाल तिकडे व्यवसायाच्या खूप संधी आहे.

जगाच्या प्रत्येक टप्प्यावर व्यवसायाच्या भोवताली संधी आहेत. त्यासाठी चाकोरी मोडली पाहिजे. व्यवसाय करणारांनी काम करण्याची लाज वाटू देवू नये असे परखड विचार मांडले. प्रेरणादायी प्रवास मुलाखतीतून उलगडला.सहकार महर्षी सार्वजनिक वाचनालय, व बाळासाहेब पवार फाऊंडेशन कन्नड यांच्या वतीने लोकनेते बाळासाहेब पवार व्याख्यानमालेचे आयोजन दि. २३ ते २५ जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे.

या व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प मॅब एव्हिएशन चे संचालक मंदार भारदे यांनी गुंफले. एका मराठमोळ्या विमान कंपनी मालकाची मुलाखत एक्सपर्ट ग्लोबल सोल्युशन तथा सदस्य मराठवाडा वैधानिक विकास मंडळ चे मुकुंद कुलकर्णी यांनी घेतली. कार्यक्रमाचे स्वागतपर अभंग निशा राठोड हिने सादर केला. प्रारंभी लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

प्रास्तविक विनोद पवार यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत सागर जाधव, ज्ञानेश्वर गायके यांनी केले. कार्यक्रमास वाचनालयाचे अध्यक्ष मानसिंह पवार, डॉ. ए.के. महाले, अन्वर खॉ पठाण, सुबोध जाधव, भगिरथ पाटील, सागर जाधव, रणविरसिंह पवार, मुक्तार खॉन, अॅड. कृष्णा जाधव, श्याम महाले, सरिता कुलकर्णी, प्राचार्य राहुल क्षिरसागर, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, डॉ. रमेश सूर्यवंशी, प्रा. रंगनाथ लहाने, प्रा. एस. ए. नवले, डॉ. रुपेश मोरे, संजय जाधव, रामराव शिंदे, डॉ. के. एल. भानुसे, रामकृष्ण पवार, राजेंद्र भोसले, प्रा. संतोष देशमुख, प्रा. एच. जी. पवार , प्रा. संतोष मतसागर, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत शिंदे यांनी केले तर आभार रामनाथ टेकाळे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, युवक, शिक्षक, पालक, महिला आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ जानेवारी २०२५


## प्रजासत्ताक दिन विशेष : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ८८ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन

**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) :** आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, २७ जानेवारी १९५० ला दिल्ली येथे मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, "प्रामाणिकपणा, कर्तव्याची जाणीव व राष्ट्रीय हिताची दृष्टी ही महाराष्ट्राची परंपरा आहे." तसेच "२९ जानेवारी १९३२ ला स्वाभिमानाचा व स्वातंत्र्याचा दीप कधीही विझता कामा नये."

या दोन्ही विधानाच्या अनुक्रमे ७५ व्या व ९३ व्या वर्धापनदिनानिमित्त विषय : प्रामाणिकपणा, कर्तव्याची जाणीव व राष्ट्रीय हिताची दृष्टी ही महाराष्ट्राची परंपरा आहे.

करिता स्वाभिमानाचा व स्वातंत्र्याचा दीप कधीही विझता कामा नये. या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ८८ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे दिनांक २६ जानेवारी २०२५, रविवारला प्रजासत्ताक दिनानिमित्त दुपारी २:३० वाजता आयोजन करण्यात आले आहे.

तरी आपण फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जणसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक : ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे उपस्थित राहावे. या कार्यशाळेला सामाजिक कार्यकर्त्या निरंजना वाघमारे (आनंद) ह्या उद्घाटनपर मार्गदर्शन करणार असून इंजिनिअर किशोर पाटील हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.

तसेच ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. सर्व उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी या कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यावे.

करिता ८८ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.






## डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात २५ जानेवारी २०२५ शनिवार रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्त्व व कर्तव्य याबद्दल माहिती देण्यात आली.

तसेच राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वयाची अठरा वर्ष पूर्ण केलेल्या नवमतदारांना मतदान यादीत नाव नोंदणीसाठी प्रोत्साहन देणे, निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढविणे, निःपक्षपणे मतदान करणे याविषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून सर्व विद्यार्थिनी तथा प्राध्यापक, शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेतली.

यावेळी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी मतदान दिवस साजरा करण्यामागचे उद्दिष्ट व त्याचे महत्त्व प्रतिपादित केले.

या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार, डॉ.अन्विता अग्रवाल, डॉ. प्रतिभा धोंडकर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. संध्या पेंडकर, डॉ. शोभा हनवते, प्रा. किरण कुलकर्णी, प्रा. प्रतिभा औताडे तथा बहुसंख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त महाविद्यालयात विविध स्पर्धा संपन्न




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** लोकशाही व्यवस्थेमध्ये लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींची भूमिका महत्त्वाची असते आणि प्रतिनिधी निवडून देण्याची महत्त्वाची जबाबदारी मतदारांवर असल्याने ज्या तरुणांची वयाची आठरा वर्ष पूर्ण झाली असतील त्यांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवावीत आणि मतदान प्रक्रियेत सहभाग घ्यावा त्यामुळेच लोकशाही यशस्वी होऊ शकेल असे मत प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात तहसील कार्यालय उमरगा आणि महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण कार्यक्रम घेण्यात आला.

याप्रसंगी नायब तहसीलदार मा. प्रवीण कावरे यांनी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यामागची भूमिका विद्यार्थ्यांना सांगितली. तहसील कार्यालयातील दत्ता सूर्यवंशी, संदीप सरपे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मतदारांसाठीच्या प्रतिज्ञाचे सामूहिक वाचन करण्यात आले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग, एनसीसी विभागाच्या वतीने निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. निबंध स्पर्धेत सोनाली दुधभाते यांनी प्रथम, गौरी मुळे यांनी द्वितीय, समीक्षा सुरवसे यांना तृतीय, तर श्रुती पांचाळ यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.

वक्तृत्व स्पर्धेत स्वरुपा जगदाळे यांनी प्रथम, झरे वैष्णवी यांनी द्वितीय, गंगोत्री चिंचोले यांनी तृतीय, तर चव्हाण प्रज्वल यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. रांगोळी स्पर्धेमध्ये धने अनिशा यांना प्रथम, जगदाळे स्वरुपा यांना द्वितीय, शिंदे प्रियंका यांना तृतीय तर नेहा गिरी यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

पारितोषिक प्राप्त सर्व विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. संजय अस्वले आणि नायब तहसिलदार मा. प्रवीण कावरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि बक्षीस वितरण करण्यात आले. याप्रसंगी प्रा. सुनील बिराजदार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, राज्यशास्त्र विभाग प्रमुख सुनील बिराजदार, डॉ. ढोबळे डी. बी., कॅप्टन डॉ. ज्ञानेश्वर चित्तमपल्ले डॉ. अनिल देशमुख, प्रा. श्रीकांत कुंभार, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. डी . बी. ढोबळे यांनी तर उपस्थिताचे आभार डॉ. अनिल देशमुख यांनी मानले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ जानेवारी २०२५


## माधवराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय मतदान दिन विविध कार्यक्रमाने साजरा...विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय मतदान दिन विविध कार्यक्रमाने साजरा करताना चंद्रकांत बिराजदार, महेश मोटे, रवींद्र आळंगे व अन्य.

**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र पदवी-पदव्युत्तर विभाग व संशोधन केंद्र व माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी च्या संयुक्त विद्यमाने आयोजित मतदान जनजागृती अभियान अंतर्गत राष्ट्रीय मतदान दिन शनिवारी (ता. २५) रोजी विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते मतदान जनजागृती अभियानाच्या पत्रक व भिंतीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

लोकशाही आणि मतदानाचा मूलभूत हक्क या विषयावर प्रा. डॉ. महेश मोटे यांनी विस्ताराने मार्गदर्शन केले. यावेळी चंद्रकांत बिराजदार म्हणाले की, युवकांनी मतदानाचा अधिकार हे घटनात्मक व मूलभूत अधिकार असल्याने या अमूल्य अधिकाराचा वापर अतिशय जबाबदारीने पार पाडला पाहिजे.

यावेळी माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीचे समन्वयक प्रा. डॉ. रवींद्र आळंगे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे मराठवाडा उपाध्यक्ष प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. रवींद्र गायकवाड, प्रा. दयानंद बिराजदार, डॉ. अविनाश मुळे, डॉ. विलास खडके, डॉ. शिला स्वामी, प्रा. नाना बेंडकाळे, प्रा. प्रियंका काजळे, प्रा. राजनंदिनी लिमये, प्रा. सदाफलमास मुजावर आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी सामुदायिक मतदान प्रतिज्ञेचे वाचन कुमारी प्रियंका मुंडासे यांनी केले. हिराबाई सोलापूरे यांनी मतदान जनजागृती संदर्भात घोषणाबाजी करून घोषवाक्य उद्गारून वातावरण निर्मिती केली. नागरिकांनी मतदान का करावे ? या पत्रकाचे लेखन कुमारी दिव्या सूर्यवंशी यांनी केले. भारतीय लोकशाही आदर्श हे भिंतीपत्रक कुमारी प्रीती मुंडासे यांनी बनवले.

आरती कांबळे, किशोर कारभारी, सलोनी वाघे, नबीलाल जमादार, दिनेश गडवे, प्रभाकर महिंद्रकर आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सायबण्णा घोडके घोडके यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. नागनाथ बनसोडे तर आभार प्रा. पायल अंबर यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## बलसुरमध्ये घेतली विद्यार्थ्यांनी सर्वांसोबत शपथ




**उमरगा : (प्रा.नागसेन कांबळे) :** तालुक्यातील बलसूर येथील श्री.छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालयात शनिवारी (ता.25 ) राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने लोकशाहीवर निष्ठा ठेवण्यासंबंधी शपथ घेण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. लोकशाही अधिक मजबूत आणि पारदर्शी करण्यासाठी आपल्या कर्तव्याची जाणीव करून देण्यात आली.

यावेळी प्राचार्य एस.ए.आवताडे, नोडल अधिकारी प्रा.परमेश्वर सूर्यवंशी, प्रा.पी.आर.कांबळे, प्रा.विजय घोडके, प्रा.बी.टी.जाधव, कवी एस.टी.गायकवाड, बळीराम नांगरे, अविनाश सुरवसे,पवन माळी,परमेश्वर नागरजोगे, नागनाथ तेलंग, ज्ञानेश्वर जाधव,विठ्ठल जोशी, विशाल पाटील, जे.डी.बुवा,सुनिता सांळुके, आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रा.सूर्यवंशी म्हणाले की, जगामध्ये भारतीय लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. मतदान हे पवित्र राष्ट्रीय कार्य असून यात सर्वांनी सहभाग घ्यावा. युवकांनी समाजात वावरताना परिसरातील नागरिकांनाही मतदानाचे महत्त्व पटवून दयावे.

यानिमित्त महाविद्यालयात रांगोळी, काव्यवाचन, वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा घेण्यात आली. यात विद्यार्थ्यांनी उत्सुर्त सहभाग नोंदवला, दिव्यांग व नवमतदार यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रा.बी.व्ही. नांगरे यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार संजय गायकवाड यांनी मानले.कार्यक्रमासाठी के.डी. कांबळे, गणेश वाडीकर, शंकर बिराजदार, निलेश सूर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले.

## दि.२७ जानेवारी रोजी छत्रपती संभाजीनगर शहरात होणाऱ्या परभणी ते मुंबई लाँगमार्च मध्ये आंबेडकरी समाजबांधव लाखोंच्या संख्येने सहभागी होणार...

### ऐतिहासिक लाँगमार्चसाठी अखिल भारतीय भिक्खू संघ व सर्व पक्षीय आंबेडकरवादी पक्ष संघटनांनी केले नियोजन..



**छत्रपती संभाजीनगर :** परभणी येथे कोंबिंग ऑपरेशनच्या नावावर निर्दोष आंबेडकरवादी समाजबांधवावरील झालेल्या अमानुष अत्याचार व यामध्ये शहीद झालेले आंबेडकरी भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी व लोकनेते विजयदादा वाकोडे तसेच बिड येथील निघून हत्या झालेले सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी परभणी येथून मुंबई मंत्रालयावर जाण्यासाठी हजारो वयोवृध्द माता-भगिनी, लहान मुले यांना सोबत घेऊन भिमसैनिकांचा पायी लाँगमार्च निघाला असुन हा ऐतिहासिक लाँगमार्च दि. २७ जानेवारी २०२५ रोजी आपल्या छ. संभाजीनगर शहरात पोहचणार आहे.

तरी या ऐतिहासिक परभणी ते मुंबई लाँगमार्च मध्ये शहरातील आंबेडकरी समाजबांधव लाखोंच्या संख्येने सहभागी होणार आहेत.तसेच या लाँगमार्चमध्ये अखिल भारतीय भिक्खु संघ व सर्व पक्षीय आंबेडकरी पक्ष संघटना तसेच सर्व संविधानवादी संघटनाही मोठ्या प्रमाणावर सामील होणार आहेत. दि. २६ जानेवारी रोजी सायंकाळी हा लाँगमार्च केंब्रिज चौकातून चंपावती लॉन येथे मुक्कामी राहणार असून या ठिकाणी त्यांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था भिमसैनिकांकडून करण्यात आली आहे. तसेच दि. २७जानेवारी ला सकाळी ९.०० वाजता केंब्रिज चौकातुन या ऐतिहासिक लाँगमार्च शहरात प्रवेश करणार आहे.

पुढे जालना रोडवरून चिकलठाणा, धुत हॉस्पिटल चौक, मुंकुदवाडी चौक, एपीआय कॉर्नर चौक, सिडको बस स्टॅंड चौक, सेव्हन हिल चौक, आकाशवाणी चौक, रमानगर चौक, क्रांती चौक येथे शहीदांना अभिवादन करून पुढे सिल्लेखाना चौक, पैठण गेट, गुलमंडी, सिटीचौक मार्गे भडकल गेट, मिलकॉर्नर, मिलिंद हायस्कूल चौक, विद्यापीठ गेट येथे अभिवादन करून पुढे विद्यापीठ परिसरातून धम्मभूमी बौद्ध लेणी येथे अभिवादन सभा होऊन लाँगमार्च येथे मुक्कामी थांबणार आहे.

बुद्ध लेणी येथे पुज्यनिय भंते विशुद्धानंद बोधी महाथेरो व भिक्खु संघाच्या वतीने लाँगमार्च मध्ये सहभागी भिमसैनिकांची निवासाची व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच शहिदांना अभिवादन म्हणून बुद्ध भिमगितांचा अभिवादनपर कार्यक्रमही ठेवण्यात आलेला आहे.

यानंतर दि. २८ जानेवारी रोजी सकाळी मुंबईकडे ऐतिहासिक लाँगमार्च मार्गस्थ होणार आहे.वरील सर्व चौकांमध्ये विविध वसाहतीतील बौद्ध, आंबेडकरी व संविधानवादी अनुयांयाकडून या ऐतिहासिक लाँगमार्च मधील भिमसैनिकांचा सन्मान करून त्यांना जिवनावश्यक व अत्यावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्यात येणार आहे.

आज अखिल भारतीय भिक्खु संघ व सर्व पक्षीय आंबेडकरवादी पक्ष संघटनांच्या वतीने अजिंठा शासकीय विश्रामगृह जाहिर पत्रकार परिषदेतुन आपल्या न्याय हक्कांसाठी व संविधान रक्षणासाठी निघालेल्या या ऐतिहासिक लाँगमार्च मध्ये सर्व आंबेडकरवादी व संविधानवादी जनतेला सामील होण्याचे आवाहन अखिल भारतीय भिक्खु संघ व सर्वपक्षीय आंबेडकरी पक्ष संघटनाच्या वतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेचे प्रास्ताविक दिपक निकाळजे यांनी केले तर भंते संघप्रिय थेरो, भंते नागसेन थेरो भंते बोधिधम्मो, प्रकाश निकाळजे, गौतम लांडगे, बंडु कांबळे, गौतम खरात, आनंद कस्तुरे,विशाल इंगळे, अरविंद कांबळे, अमित वाहुळ, सचिन जोगदंडे, नागेश केदारे, नागेश जावळे, कपिल बनकर, सोनु नरवडे,कुणाल खरात, नितीन आदमाने, कमलेश नरवडे, विजय शिंदे, सरदारसिंग चव्हाण, विक्रम सुट्टे, संजय बनसोडे, निखिल निकाळजे,चंद्रकांत पैठणे, संतोष चव्हाण, भंते बोधीधम्मा, भंते भद्रिय, भंते आनंदबोधी, भंते अस्वजित, भंते आनंददिप, भंते आर्यकुमार, भंते मैत्रीय, भंते बोधिरत्न, आयु. अनिल नवगिरे, आयु. दादाराव सोनटक्के, अनिल गायकवाड व मोठ्या संख्येने भिखखु संघ व आंबेडकरवादी सर्वपक्षिय पक्ष संघटनाचे प्रतिनिधि कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ जानेवारी २०२५

# अभिजात मराठी भाषेला लोकल टू ग्लोबल होण्यासाठी विकिपीडिया लेखन महत्त्वाचे....! ग्रंथपाल राहुल अंभोरे



**जालना** : स्थानिक भाषेला जागतिक पातळीवर शिरकाव करण्यासाठी लवचिक धोरण वापरावे लागते. मराठी भाषा ही आधीपासूनच अभिजात दर्जाची भाषा आहे. या अभिजात मराठी भाषेला लोकल टू ग्लोबल होण्यासाठी विकिपीडिया लेखन महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ग्रंथपाल राहुल अंभोरे यांनी केले.

येथील श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय विभाग आणि आयक्यूएसीच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमीत्त विविध कार्यशाळा व्याख्याने संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याचाच एक भाग म्हणून मराठी भाषा संवर्धनासाठी विकिपीडिया लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. तळेकर होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ग्रंथपाल राहुल अंभोरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. वासुदेव उगले हे होते.

कार्यशाळेच्या द्वितीय सत्रात बोलताना ग्रंथपाल अंभोरे म्हणाले की, विकिपीडिया हा खुला माहितीज्ञानकोश आहे. आज विकिपीडिया माहिती स्त्रोताचे अवलोकन केल्यास लक्षात येते की, विकिपीडियावर उपलब्ध असलेली माहिती ही जास्तीत जास्त इंग्रजी भाषेतील आहे.

म्हणून इंग्रजी ही जगाची आणि जागतिकीकरणाची भाषा बनली आहे.आपल्या माय मराठीला जगाची आणि जागतिकीकरणाची भाषा बनविण्यासाठी आपल्याला विकिपीडियावर आपले साहित्य तयार करावे लागेल. माहिती तंत्रज्ञानाच्या जगामध्ये माय मराठीची समृद्ध परंपरा निर्माण करण्याची जबाबदारी सर्वस्वी आजच्या युवकांवरती आहे.

युवकांनी माय मराठी ला जागतिक बनविण्याची जबाबदारी स्वेच्छेने घेऊन खऱ्या अर्थाने माय मराठीला जागतिक भाषेचा दर्जा प्राप्त करून द्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.विकिपीडियावर लेखन करण्यासाठी खाते तयार करणे, त्या खात्याला संदर्भसूची जोडणे, जो मजकूर आपण विकिपीडियावर लिहिणार आहोत. तो मजकूर संदर्भानी कोट कसा करतात. सायटेशन म्हणजे काय? रिसर्च इंडेक्स म्हणजे काय? संशोधन करणाऱ्यांसाठी विकिपीडिया कसा विश्वासार्ह आहे.

विकिपीडियाचा संदर्भ कसा वापरावा, विकिपीडियावर उपलब्ध असलेल्या मजकुराची वस्तुनिष्ठता, विश्वासहार्यता, आदि अनेक विषयावर प्रत्यक्षकृतीसह विद्यार्थ्यांना लिहिण्यासाठी प्रेरित करण्यात आले.

कार्यशाळेच्या प्रथम सत्रात बोलताना डॉ. उगले म्हणाले की, विकिपीडिया लेखनातून मराठी भाषेचे संवर्धन कसे करता येईल? या विषयाची ही कार्यशाळा आहे. मराठी भाषेला संवर्धित करायचे असेल तर माहिती तंत्रज्ञानाच्या जगात मराठीने सामर्थ्यानिशी पाऊल टाकले पाहिजे. भाषा ही माहिती तंत्रज्ञान जगात संवर्धित करायची असेल तर जगाची भाषा प्रथम शिकावी लागेल.

जागतिक भाषेच्या बोटाला धरूनच माय मराठीला आपण जगभर पोहोचवू शकतो.कुठल्याही स्थानिक भाषेला मोठ व्हायचं असेल तर तिला स्वतःला लवचिक राहणे आवश्यक असते. मराठी ही भाषा प्राचीन काळापासूनच लवचिकतेचे धोरण स्वीकारलेली भाषा आहे. या भाषेने कित्येक राजकीय, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक व भौगोलिक परिवर्तने पाहिलेली पचविलेली आहेत.

त्यातून तयार झालेली घडलेली ही भाषा निश्चित तंत्रज्ञानाच्या जगाला ही आपलंसं करून घेईल. तंत्रज्ञानाच्या जगातही आपला कणा ताठ ठेवेल. असा मराठी भाषा विषयीचा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

विकिपीडिया हा खुल्या माहितीचा ज्ञानकोश असल्याने तेथे मराठी भाषेची समृद्ध परंपरा फार त्रोटक प्रमाणात उपलब्ध आहे. मराठीची समृद्ध परंपरा विकिपीडियाच्या विविध पानांमधून उभी करावी ही आपली सगळ्यांची जबाबदारी आहे. कार्यशाळेच्या प्रथम सत्र सैद्धातिक माहितीवर व प्रात्यक्षिकेवर आधारित होते. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.तळेकर म्हणाले की, मराठी भाषेला व साहित्याला समृद्ध दीर्घ परंपरा असल्याने मराठी भाषा तंत्रज्ञानातही मागे राहणार नाही. मात्र त्यासाठी सामुहिक प्रयत्न होणे आवश्यक आहे.

मराठी भाषेचे खरे सौंदर्य हे बोली भाषेत दडून पडलेले आहे. हे बोली भाषेतील व मौखिक परंपरेतील सौंदर्य आजच्या पिढीच्या संशोधनातून बाहेर येईल. त्यासाठी तरुणांनी स्थानिक संशोधनाकडे वळले पाहिजे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागाच्या प्रा. शीला कवडे यांनी केले तर राज्यशास्त्र विभागाचे प्रा.सचिन शेवतेकर यांनी उपस्थितांचे आभार प्रकट केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इतिहास विभागप्रमुख डॉ. सुधाकर वाघ, अर्थशास्त्र विभागाच्या प्रा. दीक्षा आनंद, प्रा.पापाजी चव्हाण, श्री.गणपत वैद्य, श्री.एकनाथ फुपाटे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थीनींची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

